**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक–१२/७/२०२४**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.४**
**जुलै २०२४**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार,दि.१९/७/२०२४** रोजी **दुपारी ०४.३० (चार वाजून तीस मिनिटे )** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**
महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.४०**

**संदर्भ–** १) निविदा क्र.०९ सन २०२१–२२ या कार्यालयाकडील जा.क्र.ई/६३७५,दि.१०/१/२०२२ ची वर्क ऑर्डर
२) बांधकाम विकास विभाग झोन क्र.१ जा.क्र.१६०८,दि.७/६/२०२२ चे मागणी पत्र.
३) बांधकाम विकास विभाग झोन क्र.२ जा.क्र.१५०९,दि.७/६/२०२२ चे मागणी पत्र.
४) बांधकाम विकास विभाग झोन क्र.२ जा.क्र.१६२६,दि.९/६/२०२२ चे मागणी पत्र.
५) बांधकाम विकास विभाग झोन क्र.६ जा.क्र.१५३१,दि.१३/६/२०२२ चे मागणी पत्र.
६) बांधकाम विकास विभाग झोन क्र.२ जा.क्र.झोन २/६१८०,दि.२/१/२०२३ चे पत्र.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/१९८५,दि.२७/३/२०२४ चे पत्र.
८) स्थायी समिती ठराव क्र.१०१,दि.११/६/२०२४

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे महानगरपालिका हद्दीतील व नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील बहुमजली अनधिकृत इमारतींची बांधकामे हायरीच जॉ–क्रशर, माऊटेड एस्कॅव्हेटर मशिनरीच्या सहाय्याने पाडणे.( बां.वि.वि.झो.क्र.१ ते ७ ) मे.ए.आय.पी. कॉर्पोरेशन यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करून घेणेस व त्यानुसार हे काम तातडीचे व आवश्यक बाब म्हणून ६७(३)(क) अंतर्गत जादा करून घेतलेल्या कामाचे देयक अदा करणे ही बाब तातडीचे व आवश्यक बाब म्हणून व त्याबाबतचे प्रतिवृत्त मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र.४१**

**संदर्भ–** १) स्थायी समिती ठराव क्र.९३६, दि.५/१/२०२१
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/९३, दि.११/६/२०२४ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र.११७,दि.११/६/२०२४

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

महंमदवाडी उंड्री शिवेवरील महंमदवाडी स.नं.१६ व ८ ते उंड्री स.नं.१२,२०,२२,२६ ते हांडेवाडी स.नं.१,२,६ दरम्यानचा २४ मी.आर.पी.रस्ता पीपीपी तत्वावर विकसित करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) महंमदवाडी उंड्री शिवेवरील महंमदवाडी स.नं.१६ व ८ ते उंड्री स.नं.१२,२०,२२,२६ ते हांडेवाडी स.नं.१,२,६ दरम्यानचा २४ मी.आर.पी.रस्ता पीपीपी तत्वावर डेव्हलपमेंट क्रेडीट नोटच्या मोबदल्यात विकसित करणे.

विषय क्र.४२

**संदर्भ–** १) स्थायी समिती ठराव क्र.१६६६, दि.२१/२/२०२४
२) मा.मनपा सभा ठराव क्र.४२३, दि.१५/३/२०२४
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१०६,दि.१४/६/२०२४ चे पत्र
४)मा.महा.आयुक्त यांची दि.२१/६/२०२४ ची उपसूचना.
५) स्थायी समिती ठराव क्र.१२९,दि.२१/६/२०२४

-----

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन करून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

**संदर्भ क्र.४ च्या उपसूचनेनुसार –**

स्वच्छ पुणे सेवा संस्था यांचे मान्य करारनाम्यामध्ये सुधारित मुद्दे समाविष्ट करणेच्या अनुषंगाने दि.१२/३/२०२४ रोजी मा.महापालिका आयुक्त व मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(इ) यांनी दिलेले आदेशानुसार स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेसमवेत दि.२६/१/२०२४ पासून ते २५/१/२०२९ या पाच वर्षे कालावधीसाठी करावयाच्या करारनाम्यामध्ये खालीलप्रमाणे बदल करणेस व त्यानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**१) नि.पान क्र.११ मधील सुधारित मुद्दा क्र.४**

स्वच्छ संस्थेच्या कचरा वेचकांमार्फत ज्या पॉकेटमध्ये कचरा संकलनाचे काम सुरू आहे,त्याठिकाणी स्वच्छ संस्थेच्या कचरा वेचकांच्या चुकीमुळे क्रोनिक स्पॉट आढळल्यास संबंधित कचरा वेचकाला जबाबदार धरून रक्कम रू.५००/– इतकी दंडात्मक कारवाई संबंधितांवर आरोग्य निरीक्षक यांचे मार्फत करण्यात येईल. सलग तीन वेळा असा प्रकार घडल्यास महापालिका सहाय्यक आयुक्त यांचेकडून अहवाल मागवून स्वच्छ संस्थेकडून सदर भागातील कचरा संकलन करणेकामी अन्य संस्थांची नेमणूक करण्याबाबत मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(इ) पुणे महानगरपालिका अंतिम निर्णय घेतील.

**२) नि.पान.क्र.११ मधील सुधारित मुद्दा क्र.५**

फिडर पॉईंट स्वच्छ करण्याची जबाबदारी स्वच्छ संस्थेच्या कचरा वेचकांची असेल. फिडर पॉईटसचे ठिकाणी अस्वच्छता आढळल्यास संबंधित कचरावेचकावर दंडात्मक कारवाई करून सदर बाब वारंवार घडत असल्यास त्यांच्यावर पुढील कारवाई करण्याचे अधिकार मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) पुणे महानगरपालिका यांना राहील.

**३) नि.पान.क्र.१५ मधील सुधारित मुद्दा क्र.३१**

या वाढत्या कार्यक्षेत्रातील दैनंदिन दारोदारी कचरा संकलनाचे व्यवस्थापन करणे, त्यासाठी आवश्यक पर्यवेक्षकीय स्टाफची नियुक्ती करणे, नव्याने समाविष्ट भागांत कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करणे व तदनुषंगिक इतर कामे करणेकामी सध्याच्या १४६ पर्यवेक्षकीय व इतर स्टाफमध्ये वाढ करून अंदाजे १–२ आरोग्य कोठीमागे ( म्हणजेच ९०००–१०००० मिळकतीमागे ) एक पर्यवेक्षक ( एकूण १४४ प्रभाग समन्वयक ) याप्रमाणे पर्यवेक्षकीय व इतर स्टाफ मिळून एकूण १८० स्टाफ नियुक्त करणे प्रस्तावित आहे. स्वच्छ संस्थेचे प्रभाग समन्वयक कोणत्याही शाखेचे किमान पदवीधर असणे तथापि MSW अथवा घनकचरा व्यवस्थापन / पर्यावरण आरोग्य विषयक Post Graduate पदवी / पदविका किंवा स्वच्छ सर्वेक्षणबाबत योग्य ती शैक्षणिक पात्रता ठरवण्याचे अधिकार मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) पुणे महानगरपालिका यांना राहील.

**४) नि.पान.क्र.१८ मधील सुधारित मुद्दा क्र.३९**

स्वच्छ सहकारी संस्थेप्रमाणे इतर कोणत्याही संस्था किंवा व्यक्तीने शहरातील दारोदारी कचरा संकलनाचा प्रस्ताव सादर केल्यास स्वच्छ संस्थेसमवेत केलेल्या करारातील अटी व शर्तीस आधीन राहून स्वच्छ संस्थेस ठरवून दिलेल्या कार्यप्रणालीनुसारच संबंधित इतर व्यक्ती किंवा संस्थेने काम करणे बंधनकारक राहील. या व्यक्ती किंवा संस्थेने स्वच्छ संस्थेमार्फत काम केल्या जाणाऱ्या भागांव्यतिरिक्त उर्वरित भागांत, सलग पॉकेट / गट मध्ये काम करणे अपेक्षित राहील स्वच्छ व्यतिरिक्त इतर संस्थेची स्वतंत्रपणे नेमणूक करावयाची झाल्यास त्यासाठीची सविस्तर कार्यप्रणाली परिशिष्ट **ड** मध्ये विषद करण्यात आलेली आहे.

**५) नि.पान.क्र.१८ मधील सुधारित मुद्दा क्र.४० समाविष्ट करण्यात आला.**

आवश्यक मार्गदर्शन सूचना वेळोवेळी काढण्याचा अधिकार मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) पुणे महानगरपालिका यांचेकडे राहील.

**६) नि.पान.क्र.२१ परिशिष्ट अ मधील सुधारित मुद्दा क्र.४**

स्वच्छ संस्थेच्या वारंवार चुकीमुळे त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्रात क्रॉनिक स्पॉट आढळल्यास याबाबत संबंधित आरोग्य निरीक्षक स्वच्छ समन्वयकांना कळवतील व शहानिशा करून कचरावेचकांचा कामाबाबतचा संबंधित क्षेत्रिय

कार्यालयाकडून अहवाल मागवून स्वच्छ संस्थेकडून सदर भागातील कचरा संकलन थांबवून त्याठिकाणी अन्य संस्थांची नेमणूक करण्याचा अधिकार मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) पुणे महानगरपालिका यांना राहील.

**७) नि.पान.क्र.२५ व २६ मधील सुधारित परिशिष्ट ड १० ऐवजी १६ मुद्यांचा समावेश करण्यात आले.**

**स्वच्छ संस्थेच्या धर्तीवर इतर संस्थांना दारोदारी कचरा संकलनाच्या कामात समाविष्ट करून घेणेविषयी कार्यप्रणाली – सुधारीत परिशिष्ट ड:**

१) स्वच्छ सहकारी संस्थेप्रमाणे इतर कोणत्याही संस्था किंवा व्यक्ती यांस शहरातील दारोदारी कचरा संकलनाचे कामकाज करावयाचे असल्यास अशा संस्था किंवा व्यक्ती यांनी पुणे महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर करावा.

२) नव्याने प्रस्तावित संस्था किंवा व्यक्ती यांचे अंतर्गत एकाच क्षेत्रिय कार्यालयांतर्गत स्वच्छ व महानगरपालिकेच्या कचरावेचकां व्यतिरिक्त काम करणारे कमीत कमी १०० कचरा वेचक कार्यरत असणे आवश्यक आहे. १०० हून कमी कचरावेचक कार्यरत असल्यास अशा संस्था किंवा व्यक्ती यांनी त्यांचेकडील कचरावेचकांस स्वच्छ सहकारी संस्थेमध्ये समाविष्ट करून घ्यावे.

३) ज्या संस्था किंवा व्यक्ती यांचेकडे एकाच क्षेत्रिय कार्यालयांतर्गत काम करणारे १०० हून जास्त कचरावेचक कार्यरत असतील अशा संस्था किंवा व्यक्ती यांचेशी पुणे महानगरपालिकेच्या मा.मुख्य सभेच्या मान्यतेने ११ महिने कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर कामकाज करण्यासाठीचा करार करण्यात येईल.

४) या ११ महिन्यांच्या प्रायोगिक तत्वावर कामकाज करण्याच्या कालावधीत सदरील संस्था किंवा व्यक्ती यांस शहरातील दारोदारी कचरा संकलनासाठी स्वच्छ सहकारी संस्थेसमवेत केलेल्या करारातील अटी व शर्तीस आधीन राहून स्वच्छ संस्थेस ठरवून दिलेल्या कार्यप्रणालीनुसारच संबंधीत इतर संस्था किंवा व्यक्ती यांस काम करणे बंधनकारक राहील.

५) संबंधित इतर संस्था किंवा व्यक्ती यांचे अंतर्गत कार्यरत कचरावेचक यांनी स्वच्छ सहकारी संस्थेसमवेत केलेल्या करारात ठरवून दिल्याप्रमाणेच नागरिकांकडून सेवाशुल्क आकारणे बंधनकारक राहील.

६) संबंधीत इतर संस्था किंवा व्यक्ती यांनी शहरातील स्वच्छ सहकारी संस्थेमार्फत काम केल्या जाणाऱ्या भागांव्यतिरिक्त उर्वरित भागात काम करणे अपेक्षित आहे. स्वच्छ किंवा महानगरपालिकेमार्फत थेट पुरवलेल्या सेवेमध्ये अडथळा निर्माण करायला किंवा सद्यस्थितीत कार्यरत स्वच्छच्या कचरावेचकांचे काम काढून घ्यायला परवानगी नसेल.संबंधित संस्थेने त्यांना दिलेल्या पॉकेटमधील / भागातील सर्व आस्थापनांचा कचरा संपूर्णपणे उचलावा.

७) इतर संस्था किंवा व्यक्ती यांचेकडे कार्यरत कचरा वेचकांस पुणे महानगरपालिकेकडून आवश्यक सुरक्षा प्रावरणे व दैनंदिन कामकाजासाठी लागणारे साहित्य पुरविले जाईल. ( स्वच्छ सहकारी संस्थेच्या कचरावेचकांस दिल्याप्रमाणे )

८) इतर संस्था किंवा व्यक्ती यांचेसमवेत करण्यात येणारा करार हा प्रायोगिक तत्वावरील असल्यामुळे या कालावधीत सदर संस्था किंवा व्यक्ती यांस पुणे महानगरपालिकेकडून देखरेख व व्यवस्थापन, प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च, आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ.प्रशासकीय शुल्क दिले जाणार नाही.

९) तसेच संबंधीत संस्था किंवा व्यक्ती यांचेमार्फत कार्यरत कचरावेचकांस पुणे महानगरपालिकेकडून बदली सेवकांसाठीचा खर्च, ढकलगाडी दुरूस्तीचा खर्च व झोपडपट्टी, एस.आर.ए.मिळकती व अघोषित वस्ती भागाकरीता दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता (slum subsidy ) इ.खर्च दिला जाणार नाही.

१०) सदर संस्था किंवा व्यक्ती यांचेमार्फत काम सुरू असणाऱ्या भागातील संबंधीत आरोग्य निरीक्षक, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, प्रमुख आरोग्य निरीक्षक, संबंधित महापालिका सहाय्यक आयुक्त व संबंधीत परिमंडळ उपआयुक्त यांचेकडून संबंधीत भागातील कामकाजाविषयी दर तीन महिन्यांनी लेखी अभिप्राय घेताल जाईल व त्यावरून सदर संस्था किंवा व्यक्ती यांचेमार्फत केल्या जाणाऱ्या कामाचा एकत्रित आढावा घेताल जाईल.

११) कोणत्याही भागात कचरासंकलन सेवा मोफत ( म्हणजे सेवाशुल्काची आकारणी न करता ) दिली जात नाही हे सुनिश्चित करावे. अशी मोफत सेवा असेल तर अपेक्षित घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा उभारली जाऊ शकणार नाही.

१२) **खालील परिस्थितीत मोफत कचरा संकलन सेवा चालू ठेवण्याची परवानगी नाही.**

* जिथे मिश्र किंवा वर्गीकृत न केलेल्या कचऱ्याचे संकलन, साठवण, वाहतूक, हस्तांतरण, प्रक्रिया किंवा विल्हेवाट कचरा निर्माण करणाऱ्यांकडून किंवा सेवादायी संस्थेकडून होत असेल आणि जेणेकरून घनकचरा व्यवस्थापनांच्या नियमांचे उल्लंघन होत असेल.
* ज्या भागांमध्ये घरोघरी जाऊन कचरासंकलनाच्या अंमलबजावणीकरिता पुणे मनपा आणि स्वच्छ दोघांकडून संसाधनांचा वापर, सदर करारातील अटी व शर्तीनुसार केला जाणार आहे.
* लागू असलेले कायदे, नियम आणि नियमनात बदल होऊन जर कचरानिर्मिती करणाऱ्यांकडून सेवा शुल्क घेणे अनिवार्य झाले आणि जिथे सेवा पुरविण्याच्या खर्चाचा काही हिस्सा पुणे मनपाकडून केला जातो किंवा ज्या खर्चाची भरपाई पुणे मनपाकडून मिळते.

१३) ज्या ठिकाणी वरील नमूद सेवादायी संस्था पुणे मनपासोबत करार करणार नाहीत. किंवा त्यातील अटी व शर्तीचे पालन करणार नाहीत, किंवा सेवा शुल्क गोळा करण्यास नकार देतील, किंवा कार्यवाही क्षेत्र बदलतील,अशावेळी पुणे मनपाकडून तातडीने त्यांच्या सेवा खंडित करण्याची आणि घरोघरी जाऊन कचरासंकलनाची सेवा स्वच्छकडे किंवा अटी व शर्तीचे पालन करणाऱ्या दुसऱ्या सेवादायी संस्थेकडे सोपवण्याची खबरदारी घेतली जाईल.

१४) अशा संस्थांनी किंवा कचरावेचकांनी महानगरपालिका व स्वच्छच्या संयुक्त विद्यमाने चालवलेल्या सेवेप्रमाणे सहकारी तत्वावर काम करणे बंधनकारक राहील. महानगरपालिकेकडे नोंदणीकृत कचरावेचकांना प्राधान्य क्रमाने अशा कामात नेमले जाईल. सेवा शुल्क व भंगार विकून मिळणारा मोबदला कचरावेचकांच्या मालकीची असणे गरजेचे राहील.तसेच कचरावेचकांना सब-कॉट्रॅक्ट, मानधन किंवा वेतन तत्वावर घेतल्यास त्यांना किमान वेतन व इतर कामगार कल्याण कायद्याप्रमाणे पगार देणे बंधनकारक राहील. अशा संस्थांनी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत रहिवाशी व झोपडपट्टी भागात सुध्दा कार्यरत असणे गरजेचे राहील.

१५) घरोघरी जाऊन कचरासंकलन व्यवस्था यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापन प्रणालीचे सातत्य, कार्यवाही क्षेत्राची निश्चिती आणि अंमलबजावणीमध्ये सारखेपणा असणे अत्यंत महत्वाचे आहे, हे दोन्ही पक्षांना मान्य आहे. सर्व कार्यवाही क्षेत्रांपर्यंत सेवा दिली जाईल या दृष्टीने कामाचा टप्प्याटप्प्याने विस्तार करणेही स्वच्छची जबाबदारी राहील. अशा प्रकारे सेवा सर्वत्र पोचविण्यात ज्या अडचणी येतील त्या दूर करणे आणि सदर कराराचे उल्लंघन करत असलेली सेवा न देणे वा तशी सेवा द्यायला परवानगी न देणे, ही पुणे मनपाची जबाबदारी राहील. अशाप्रकारे करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या सेवा जर दोन्ही पक्षातील कोणासही निदर्शनास आल्या तर ताबडतोबीने खंडित व्हाव्यात यासाठी, उपलब्ध कायदे व नियमांचा वापर करून आवश्यक पावले त्यांच्याकडून उचलली जातील.

१६) सदर संस्था किंवा व्यक्ती यांच्या ११ महिन्यांच्या प्रायोगिक तत्वावरील कामकाजाचा आढावा घेऊन सदर संस्था किंवा व्यक्तीसमवेत पुढे कामकाज सुरू ठेवावे अगर कसे याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

**( टीप – मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)**

<u>विषय क्र.४३</u>

**संदर्भ–** १) ठेकेदार मे. रक्षक सिक्यूरिटी सर्विसेस अँन्ड सिस्टम प्रा.लि.यांचे ६७(३) अन्वये काम करण्यास इच्छुक असलेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ कार्यालयाकडील संमती पत्र आवक क्र.३५, दिनांक २/४/२०२४

२) मे.श्री.एंन्टरप्रायजेस यांना वाढीव कामाचे कार्यादेश जा.क्र.११५०५, दि.१८/३/२०२४

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि क्र.४/१०८, दि.१८/६/२०२४ चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्र.१३१,दि.२१/६/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र.४ अंतर्गत हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सार्वजनिक स्वच्छतेसाठी बिट्सनुसार झाडणकाम आऊटसोर्सिंगने करून घेणे याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ६७(३)(क) अन्वये ठेकेदाराची नेमणूक करणेस व त्यानुसार हे काम तातडीची व आवश्यक बाब म्हणून ६७(३)(क) अंतर्गत करून घेणेची खालील बाब व त्याबाबतच्या खर्चाच्या पश्चात मान्यतेसाठी प्रतिवृत्त मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात यावे.

**१)** हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आउट सोर्सिंग पध्दतीने हद्दीतील झाडणकाम माहे जानेवारी २०२४ पासून ते नवीन निविदेचे कार्यादेश होईपर्यत या कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये ठेकेदार मे.रक्षक सिक्यूरिटी सर्विसेस अँन्ड सिस्टम प्रा.लि.यांचेकडून मा.तांत्रिक समिती यांचेकडून मान्य करून घेण्यात आलेल्या दरानुसार र.रू.९२१.३५ ( पर्यवेक्षक शुल्क सहित ) प्रति दिवस / प्रति बिट्स (०.००टक्के कमी/जास्त ) म्हणजेच अॅटपर या दराने काम करून घेणेस तसेच मा.कामगार अधिकारी यांचेकडून वेळोवेळी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या किमान वेतन कायद्यानुसार देण्यात येणाऱ्या वेतनानुसार येणारी रक्कम अदा करणेस व त्यानुसार त्यांच्याशी करारनामा करणे.

<u>विषय क्र.४४</u>

**संदर्भ–** १) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक-अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३,दि.१४/७/२०२२

२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक-अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३,दि.१६/९/२०२२

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र जा.क्र.मजीप्रा/मनिसंसकक्ष/अमृत २.०/५३४/२०२२,दि.१०/१०/२०२२

४) कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र जा.क्र.तांशा(यां) ३१७६/२०२३,

दि.२७/९/२०२३

५) मा.महापालिका आयुक्त यांना खात्यामार्फत यापूर्वी सादर केलेले निवेदन जा.क्र.१६६२,दि.५/१०/२०२३ ( र.रू.४१७,७१,५६,३७९ जी.एस.टी.वगळूनचा प्रस्ताव )

६) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियाना अंतर्गत पुणे महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वातील असलेल्या ०६ मैलापाणी शुध्दीकरण केंद्राचे नूतनीकरण / अद्ययावतीकरण करणे अंतर्गत अनुक्रमे फेज-१ साठी जा.क्र.मु.अ.(पुणे) /तांशा२/पुणे मनपा एस.टी.पी. फेज १/११६ व फेज-२ साठी जा.क्र.मु.अ.(पुणे) /तांशा२/पुणे मनपा एस.टी.पी. फेज १/११७ साठी दि.१६/१/२०२४ रोजी सविस्तर प्रकल्प अहवालांना मे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत मिळालेली तांत्रिक मान्यता.

७) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र शासन यांना दि.१८/१/२०२४ रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला फेर प्रस्ताव.(र.रू.६७४,४४,२८,५२१.४७ जी.एस.टी.वगळून )

८) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२७, दि.२/५/२०२४ चे पत्र.

९) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१५, दि.२१/६/२०२४

१०) स्थायी समिती ठराव क्र.१५२,दि.२८/६/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार -

अमृत २.० योजनेंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील अस्तित्वात असलेल्या ०९ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापैंकी ०६ मैलापाणी शुध्दीकरण केंद्राचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नवीन Outlet Parameters प्रमाणे नुतनीकरण / अद्ययावतीकरणाबाबत मे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झालेल्या सुधारित सविस्तर प्रकल्पाच्या अहवालाच्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**१)** अमृत २.० योजनेंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील अस्तित्वात असलेल्या ०९ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापैंकी ०६ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांच्या अद्ययावतीकरण / नुतनीकरण करणे या प्रकल्पीय कामांसाठी मे.महाराष्ट्र शासन व मे.केंद्र शासन यांच्याकडून केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानामधून प्रकल्पीय निधी प्राप्त करून घेण्यास व त्यासाठी आवश्यक ते हमीपत्र शासनास सादर करणे.

**२)** अमृत २.० मार्गदर्शक तत्वे कलम ५.५ नुसार PPP व HAM मॉडेल अंतर्गत Concessionaire मार्फत निधी उभारण्यास व निविदा प्रक्रिया राबविण्यास शासनाकडून मान्यता मिळाल्यास सदर कामासाठी शासनाकडून ६० टक्के व महानगरपालिका स्व-हिस्सा निधी (४०टक्के) उभारण्यासाठी एकूण पूर्वगणन किंमत र.रू.६७४.४४ कोटी (जी.एस.टी.वगळून ) तसेच (Add 5% Cost Escalation For Construction Period + 1% MJP Scrutiny Charges +1% Labour Insurance on PWD items + 18% GST सह ) र.रू.८४०.८४ कोटी मधील पुणे मनपाच्या ४० टक्के रक्कमेचे दायित्व अन्यथा ५० टक्क रक्कमेचे दायित्व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची कलम ७२(ब) अन्वये स्वीकारणेस व सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या देखभाल व दुरूस्तीचा सर्व खर्च महानगरपालिकेच्या स्वनिधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची कलम ७२(ब) अन्वये तरतुद उपलब्ध करणे.

**३)** महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक-अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३,दि.१६/९/२०२२ अन्वये मे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्पीय रक्कमेच्या १ टक्क्याप्रमाणे र.रू.७,०८,१६,५०१.१९ एवढे शुल्क अदा करणे.

**४)** तानाजीवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्राचे बायोटॉवर जवळील काही भाग तसेच बहिरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्राचा काही भाग निर्लेखित करून ते पाडणे.

<u>विषय क्र.४५</u>

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/११२, दि.२४/६/२०२४ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१५३,दि.२८/६/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार -

पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांकरिता नळजोड देणेकामी तसेच अनधिकृत नळजोड घेतलेल्या मिळकतींसाठी दंडात्मक रक्कम घेवून नळजोड अधिकृत करणेकामी खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

अ ) अनधिकृत बांधकामांना नव्याने नळजोड देताना अर्जासोबत मालकी हक्काची कागदपत्रे, अद्ययावत टॅक्स भरल्याची कागदपत्रे/ना हरकत पत्र, आधार कार्ड प्रत, सदरचा नळजोड दिला म्हणजे बांधकाम अधिकृत होते असे नाही याबाबत ५०० रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेणे ही कागदपत्र घेवून, नियमानुसार चार्जेस भरून घेणे.

ब) मा.स्थायी समिती ठराव क्र.५२०,दि.२९/६/२०२१ मधील अ.क्र.७ मध्ये नमूद दंडासहित नळजोडशुल्क आकारून

अनधिकृत नळजोड अधिकृत करून घेणे.

क) अनधिकृत नळजोड असल्यास वरीलप्रमाणे नळजोड अधिकृत करून घेतल्यानंतरच तक्रारीची दखल घेणे.

ड) नव्याने समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठा नेटवर्क उपलब्ध असेल त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी असल्यास मान्य धोरणाच्या जास्तीत जास्त ५० टक्के पर्यत नळजोड मंजूर करणे, पाणी उपलब्ध असल्यास पूर्ण नळजोड मान्य करणे.

फ) नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील अधिकृत बांधकामांसाठी नियमानुसार कॉलनी वॉटर लाईन चार्जेस आकारणेस व सदर दर प्रत्येक वर्षाचे दरपत्रकानुसार मा.शहर अभियंता यांचे मान्यतेने ठरविणे.

<u>विषय क्र.४६</u>

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र./१२१, दि.२६/६/२०२४ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१५७,दि.२८/६/२०२४

–––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

डॉ.शशिकांत शामराव सोरटे, स्त्रीरोग तज्ञ (वर्ग १) आरोग्य कार्यालय यांचे विरूध्द कलम ५६(२)(ह) अन्वये शास्ती करणेची पूर्व मंजूरी ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(१)(अ) नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.४७</u>

**संदर्भ–** १) उपआयुक्त (वि) कार्यालयाकडील पत्र जा.उआवि/१४३,दि.१५/९/२०२२
२) उपआयुक्त (वि) कार्यालयाकडील आ.क्र.५१५,दि.१४/१०/२०२२
३) उपआयुक्त (वि) कार्यालयाकडील पत्र जा.क्र.१७०,दि.१७/१०/२०२२
४) सीओईपी टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी यांचेकडील जा.क्र. COEP-Tech/Civil/AMD/BGB/B-1184 / 3307, dt.15/3/2023
५) माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील पत्र जा.क्र.१५३२,दि.१६/३/२०२३
६) टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांचे दि.३१/१/२०२४ चे पत्र.
७) सीओईपी टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी यांचे दि.२२/२/२०२४ चे पत्र.
८) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उपआयुक्त(वि)/१३१,दि.२७/६/२०२४ चे पत्र.
९) स्थायी समिती ठराव क्र.१५८,दि.२८/६/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे शहरात खाजगी सहभागातून कौशल्यवर्धन केंद्र ( Centre for Invention, Innovation, Incubation and Training Centre (CIIIT) उभारणीकरीता टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड सोबत सामंजस्य करार करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिका व टाटा टेक्रॉलॉजी लिमिटेड या संस्थेबरोबर ( Centre for Invention, Innovation, Incubation and Training Centre (CIIIT) हा संयुक्त प्रकल्पासाठी ७२ महिने ( १२ महिने बांधकाम व केंद्र उभारणी व प्रशिक्षण कालावधी ६० महिने असे एकूण ७२ महिने ) कालावधीसाठी सामंजस्य करार करणे.

२) सदर प्रकल्पाची किंमत र.रू.२७९,६७,४५,७८२/– असून प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीपैकी पुणे मनपाचा हिस्सा १५ टक्के र.रू.४१,९५,११,८६७/– व त्यावरील वस्तू व सेवाकर (१८ टक्के ) र.रू.७,५५,१२,१३६/– असे एकूण र.रू.४९,५०,२४,००३ ( अक्षरी – एकोण पन्नास कोटी पन्नास लाख चोवीस हजार तीन रूपये फक्त ) टाटा टेक्रॉलॉजी लिमिटेड यांना आदा करणे.

३) सदर प्रकल्पासाठी लागणारा निधी र.रू.४९,५०,२४,००३/– इतका विशेषबाब म्हणून उपलब्ध करून मिळणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या निधी व्यतिरिक्त संपूर्ण लागणारा निधी पुणे मनपाचा हिस्सा म्हणून सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून घेणे.

४) सदर प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक जागा मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने सुचविल्यानुसार बाणेर येथील सर्वे नंबर १९/१+१९/४+१९/५+३०/१(पार्ट)+३०/०१/१३+१९/३+२१/१+२१/२+२१/४ प्लॉट ब चे अंदाजे क्षेत्रफळ ३६०५.२५ चौ.मी.हि ॲमिनिटी स्पेस टाटा टेक्रॉलॉजी लिमिटेड यांना संयुक्त प्रकल्प राबविणेसाठी विनाशुल्क उपलब्ध करून देणे.

५) सदर जागेमध्ये प्रस्तावित प्रकल्प राबविणेसाठी ॲमिनिटी स्पेस कमिटीची मान्यता घेणे.

६) सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर धोरणात्मक बाबीं संदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.अति.महा.आयुक्त (इ) यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त प्रस्तावित कार्यकारी समिती गठण करणे.

७) सदर प्रकल्पामध्ये काही फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना किंवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणे.

विषय क्र.४८

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि/१३२, दि.१/७/२०२४ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८,दि.१२/७/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

क्षेत्रीय कार्यालयामार्फत पावसाळ्यात तातडीची करावयाच्या कामांसाठी र.रू.३७५ लक्षचे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग<br>मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभागाकडील बजेट कोड ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. | ३७५ लक्ष<br>( २५ लक्ष प्रती क्षेत्रीय कार्यालय ) | --- |
| नविन सुचविलेले काम –<br>मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग<br>क्षेत्रीय कार्यालयामार्फत पावसाळ्यात तातडीची कामे करणेसाठी करावयाची उपाय योजना. ( प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी र.रू.२५ लक्ष ) | --- | ३७५ लक्ष |

विषय क्र.४९

**संदर्भ–** १) मा.स्थायी समिती ठराव क्र.९३६,दि.५/१/२०२१
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१३३, दि.१/७/२०२४ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७९,दि.१२/७/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

मुंढवा स.नं.१३६ व ६८ नजीक जहांगीर चौक कड वस्ती या ठिकाणी या दरम्यानचा २४ मी.डी.पी. रस्त्यावर भुयारी मार्ग पीपीपी तत्वावर विकसित करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) मुंढवा स.नं.१३६ व ६८ नजीक जहांगीर चौक कड वस्ती या ठिकाणी या दरम्यानचा २४ मी.डी.पी. रस्त्यावर भुयारी मार्ग पीपीपी तत्वावर डेव्हलपमेंट क्रेडीट नोटच्या मोबदल्यात विकसित करणे.

विषय क्र.५०

**संदर्भ–** १) ॲड.श्री.शिवम के.पंडीत यांचे शहर अभियंता कार्यालय आ.क्र.२१६९३,दि.१४/३/२०२४ रोजीची खरेदी सूचना.
२) बांधकाम विकास विभाग झोन क्र.३ कडील पत्र जा.क्र.झोन ३/२१९,दि.१५/४/२०२४ रोजीचे पत्र.
३) बांधकाम विकास विभाग झोन क्र.३ कडील पत्र जा.क्र.झोन ३/५३८,दि.२/५/२०२४ रोजीचे पत्र.
४) बांधकाम विकास विभाग झोन क्र.३ कडील पत्र जा.क्र.झोन ३/८०२,दि.९/५/२०२४ रोजीचे पत्र.
५) टी.डी.आर.सेल,शहर अभियंता कार्यालय यांचे जा.क्र.शअ/टीडीआर/१५३९,दि.२७/३/२०२४ रोजीचे पत्र.
६) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/१३९, दि.३/७/२०२४ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१८०,दि.१२/७/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व विषयपत्राचे अवलोकन करून तसेच मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे पेठ वारजे स.नं.७३/२/१(पै) (पीजी–३/ई) प्ले ग्राऊंड आरक्षण येथील महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये श्री.सुनील विठ्ठल चव्हाण तर्फे ॲड.श्री.शिवम के. पंडित यांना दिलेल्या खरेदी सूचना / परचेस नोटीस नुसार पुणे पेठ वारजे स.नं.७३/२/१(पै) १८५.८० चौ.मी.जागा प्ले ग्राऊंड (पीजी–३/ई) आरक्षणाने बाधित क्षेत्राची टी.डी.आर.देवून भूसंपादन कार्यवाही सुरू करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

विषय क्र.५१

**संदर्भ–** १) शासन निर्णय,नगरपरिषद प्रशासन संचालनालय क्र.नपप्रस/नगरोत्थान/प्र.क्र.६६४/२०२१/का७/२८६९, दि.२५/८/२०२१

२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नररोत्थान महाभियान राबविण्याबाबत ( शासन निर्णय क्र.नगरो २०२३/प्र.क्र.३८९ नवि–३३,दि.२२/२/२०२४)

३) कात्रज कोंढवा रस्त्याच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र.नगरो २०२४/प्र.क्र.१६२/नवि–३३ , दि.१५/३/२०२४

४) मा.प्रधान सचिव (नवि–२) नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना इकडील जा.क्र.मआ/माव्य/८३६,दि.९/५/२०२४ रोजी पाठविलेला प्रस्ताव.

५) मा.मुख्य अभियंता ( पथ ) कार्यालय यांचे जा.क्र.पथ/३०९०,दि.४/७/२०२४ चे पत्र.

६) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१४८, दि.५/७/२०२४ चे पत्र.

७) स्थायी समिती ठराव क्र.१९०,दि.१२/७/२०२४

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नगरोत्थान महाभियान अंतर्गत पुणे मनपा क्षेत्रातील विमानतळ व हडपसर रेल्वे टर्मिनल परिसरातील पुणे महानगरपालिकेने निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार,महत्वाच्या रेल्वे स्थानकाभोवतील डी.पी.रस्त्याचा ताबा घेणेसाठी आवश्यक तरतुद करून तडजोडीने भूसंपादन करणेकामी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील रस्त्यांचे भूसंपादन करणेस महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी ( ५० टक्के ) अदमासे रक्कम रू.२०८.५ कोटी निधी पथ व भूसंपादन व व्यवस्थापन विभागाकडून उपलब्ध करून घेवून त्यावरून खर्च करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

विषय क्र.५२

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/४५,दि.२४/५/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.७, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे बालेवाडी स.नं.२८/१अ (पै) | मटेरियल गोडाऊन (एमजी–१) ( जुना सी.एम.वाय ) आणि निवासी क्षेत्र | मे.एस.ए.प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री.सचिन रिखबलाल भंडारी | विरळ वस्ती | २४२७.०० चौ.मी. | २१४४.०० चौ.मी.x २.००= ४२८८.०० चौ.मी. | ००६१४० | एप्रिल २०२४ |

विषय क्र.५३

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/४७,दि.२४/५/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे वारजे येथील स.नं. ११२/२/९८ (पैकी) ( जुना स.नं. ११२/२/१) | १८ मी. डि.पी.रस्ता व २४ डि.पी. | संदिप शिवाजीराव जगताप | विरळ वस्ती | २६९.०० चौ.मी. | २६९.०० चौ.मी. x २.००= ५३८.०० चौ.मी. | ००६१३८ | मार्च २०२४ |

<u>विषय क्र.५४</u>

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/६०,दि.२९/५/२०२४ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे मुंढवा येथील सि.टी.एस.नं. १९३८/२, स.नं.५२/२ (जुना स.नं.५२/४) | प्रायमरी स्कूल (पी.एस.–७६ ) | पंचरत्न रिअल्टी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी एलएलपी | विरळवस्ती | १७३७.०० चौ.मी. | १७३७.०० चौ.मी. x २.००= ३४७४.०० चौ.मी. | ००६२३२ | एप्रिल २०२४ |

<u>विषय क्र.५५</u>

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/७६,दि.५/६/२०२४ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे गुलटेकडी स.नं. ५४४अ/१अ पै, टि.पी.स्किम नं.III फा.प्लॉट क्र.४३० प्लॉ.क्र.४४ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.बुशरा कन्स्ट्रक्शन | रेडीरेकनर प्रमाणे | ९२०.७९ चौ.मी. ( इमारतीचा जोते पूर्णत्वापोटीचा देय २५ टक्के टीडीआर फरकाबाबत | ००४७१४ | मे २०२४ |

<u>विषय क्र.५६</u>

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/७७,दि.५/६/२०२४ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे भवानी पेठ सि.स.नं.७७५ (पैकी) व ७७८ (पै) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.बुशरा कन्स्ट्रक्शन | रेडिरेकनर नुसार | ११९०६.७३ चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत इमारत बी करिता २५ टक्के व ३५ टक्के फरकाचा टी.डी.आर.तसेच व ३० टक्के अंशत: भोगवटयाचा टि.डी.आर.आणि इमारत सी करीता जोते पूर्णत्वापोटी निर्माण होणारा फरकाचा २५ टक्के टी.डी.आर.तसेच आरसीसी व वीट बांधकामासाठी ३५ टक्के टि.डी.आर.) | ००४७२० | मे २०२४ |

<u>**विषय क्र.५७**</u>

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/८२,दि.६/६/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | क्षेत्र.चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे गणेश पेठ सि.स.नं.११२ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. | रेडीरेकनर प्रमाणे | ३३४.०६ चौ.मी.(जोते पुर्णत्वापोटीचा २५ टक्के फरकाचा टीडीआर ) | ००४७१३ | मे २०२४ |

<u>**विषय क्र.५८**</u>

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/टीडीआर/९२,दि.११/६/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३, दि.२१/६/२०२४

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जून २०२४ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टीडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टीडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे मंहमदवाडी येथील स.नं. ८/१ अ | ६० मी.डि.पी. रस्ता व ९ मी. डि.पी.अनबिल्डेबल | एंजल होम्स प्रायव्हेट लिमिटेड तर्फे संचालक सचिन सुमितलाल लोढा आणि रश्मी सचिन लोढा | विरळ वस्ती | ५४३४.०० चौ.मी. | ५४३४.०० चौ.मी. x २.०५= १११३९.७० चौ.मी. | ००६२२६<br>००६२२७<br>००६२२८<br>००६२२९<br>००६२३० | जून २०२४ |

<u>**विषय क्र.५९**</u>

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/प्र.३/९५दि.११/६/२०२४ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४, दि.२१/६/२०२४

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा कार्यालयाकडील श्रीमती प्रिया अरूणराव येत्ते ,कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य श्रेणी –३ ) यांची पुणे महानगरपालिकेकडून नागपूर महानगरपालिकेकडे राज्य शासनाच्या मान्यतेने कायमस्वरूपी सेवा वर्ग करणेबाबतच्या मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रातील अ.क्र.१ ते ५ अटींस अधीन राहून कायमस्वरूपी सेवा वर्ग करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.६०</u>

**संदर्भ–** १) मा.अति.महापालिका आयुक्त (इ) कार्यालयाकडील बैठकीचे इतिवृत्त जा.क्र.अति.मआ/(इ)/मान्य/ ३९१२, दि.१/९/२०२२

२) मुख्य अभियंता(पथ) जा.क्र.३५८०,दि.१०/८/२०२२ चे निवेदन

३) २०५ कमिटी बैठकीचे इतिवृत्त जा.क्र.शअजा/ज/५२०१, दि.२६/६/२०२३

४) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/शहर अभियंता/३९,दि.१४/५/२०२४ चे पत्र.

५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६, दि.२१/६/२०२४

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

नवले पूल ते दरी पूल या दरम्यानच्या राष्ट्रीय हमरस्त्यालगत सर्व्हिस रस्त्याकरिता आंबेगाव बु.स.नं.४ येथील महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या नकाशानुसार २२०.० मी.लांब व ६.० मी.रूंदीच्या रस्त्याची आखणी करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.६१</u>

**संदर्भ–** १) नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनाकडील टिपीएस/१८२१/व्हीआयपी/८९/नवि– १३,दि.१७/२/२०२१ रोजीचे पत्र.

२) महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र.मआ/शअजा/ज/१२३११,दि.२/११/२०२२ अन्वये मा.अप्पर मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांना दिलेले पत्र.

३) नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनाकडील टिपीएस/१८२२/व्हीआयपी/८९/प्र.क्र.३९/२०२३/नवि– १३,दि.२५/५/२०२३ चे पत्र.

४) महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र.मआ/शअजा/ज/५२११,दि.२७/६/२०२३ अन्वये मा.अप्पर मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांना दिलेले पत्र.

५) नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनाकडील टिपीएस/१८२२/व्हीआयपी/८९/प्र.क्र.३९/२०२३/नवि– १३, दि.५/१०/२०२३ रोजीचे पत्र.

६) मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/शआ/४०,दि.१६/५/२०२४ चे पत्र

७) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१७, दि.२१/६/२०२४

**विषय –** मंजूर विकास योजना पुणे ( वाढीव हद्द ) धायरी स.नं.१३२/२ पार्ट, १३२/३ पार्ट, १३३/३ पार्ट या मिळकती मधील स्मशानभूमीचे आरक्षण ( सीआर–९) एम.आर.ॲण्ड टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वये पुर्नरचना (Re-alignment ) करणे या गौण फेरबदलाची कार्यवाही सुरू करणेबाबत.

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

विषयांकित मिळकतीमधील अस्तित्वातील स्मशानभूमीचे आरक्षण लगतचे नियोजन विभागात स्थलांतरित केल्यानंतर स्मशानभूमी आरक्षणामध्ये निर्माण होणारी कमतरता भरून काढणेकरीता लगतचे नियोजन विभागात अस्तित्वातील स्मशानभूमीचे आरक्षण या नियोजन घटकात स्मशानभूमी आरक्षण क्षेत्र २३६४.०० चौ.मी.ची कमतरता भरून काढणेस वडगाव खुर्द स.नं.६१,६२ येथील अस्तित्वातील स्मशानभूमी ( सीआर–८) मधील क्षेत्र वाढविणेस एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) नुसार पुर्नरचना या गौण फेरबदलाची कार्यवाही सुरू करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र</u>**

**<u>विषय क्र.६२</u>**

पुणे महानगरपालिकेच्या टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय येथील कै.शिवाजीराव ढेरे उद्योग भवन या इमारतीच्या तळमजल्यावर लिफ्टच्या बाजूला कोपऱ्यामध्ये असलेल्या २.१३ मी x १.४५ मी. जागेवर माजी महापौर व माजी आमदार कै.शिवाजीराव ढेरे यांचा अर्ध पुतळा बसविणेस मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/भवन/१२०, दि.२६/६/२०२४ चे पत्र.

**प्र.नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**